CMYK

तालुका क्रीडा संकुल मधील १ कोटी २० लाखाच्या विकास कामांचे संजय रायमुलकर यांच्या हस्ते भूमिपूजन >> पान 2

अमित शहांच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचे जोरदार आंदोलन >> पान 3

लोणार ग्रामीण रुग्णालयात रुग्णाचा जळून मृत्यू >> पान 4


सुविचार

ज्ञान हेच खरे संपत्तीचा खजिना आहे.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




शुक्रिया, मेहरबानी, करम दारु सोडल्यानंतर ८ वर्षांनी पूजा भट्ट हे बोलली

आतील पान


■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 133 ■ मंगळवार, दि. 24 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## सोमनाथ सुर्यवंशींची हत्याच, जबाबदार पोलिसांना कठोर शिक्षा व्हावी: राहुल गांधी

दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी : परभणीतील तरुण सोमनाथ सुर्यवंशी हा संविधानाचे रक्षण करणारा होता. तो दलित असल्यानेच त्याची हत्या करण्यात आली आहे. हा पोलीस कोठडीतील मृत्यू असून सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येला जबाबदार असणाऱ्यांना लवकरात लवकर कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज परभणी येथे सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांच्याशी सुमारे २० ते २५ मिनिटे संवाद साधला. परभणीतील घटनेची सर्व माहिती जाणून घेतली व कुटुंबाला धीर दिला.**

सुर्यवंशी यांच्या कुटुंबाला भेट दिल्यानंतर पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, सोमनाथ सुर्यवंशी यांचा कोठडीतील मारहाणीमुळे मृत्यू झाला आहे. ज्यांनी ही हत्या केली त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. मुख्यमंर्त्यांनी या प्रकरणी विधानसभेत खोटी माहिती दिल्याचे सांगत तेही याप्रकरणी तितकेच जबाबदार आहेत असे म्हटले. आरएसएसची विचारधारा ही संविधानाला संपवण्याची असून या भेटीत कोणतेही राजकारण करणार नाही. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे असे राहुल गांधी म्हणाले.

सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर राहुल गांधी यांनी आंबेडकरी कार्यकर्ते विजय वाकोडे यांच्या कुटुंबाचीही भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

परभणी व बीड प्रकरणी मुख्यमंर्त्याविरोधात विशेषाधिकार प्रस्ताव आणू.



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी हत्याप्रकरण दडपण्याचे पाप सरकार करत आहे. सुर्यवंशी यांचा मृत्यू दम्याच्या आजाराने झाल्याचे मुख्यमंर्त्यांनी विधानसभेत सांगितले पण आम्ही वस्तुस्थिती जाणून घेतली आहे, सोमनाथ सुर्यवंशींचा मृत्यू पोलीस मारहाणीमुळे झाल्याचे पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये सांगितले आहे. सोमनाथ सुर्यवंशी व संतोष देशमुख प्रकरणी अधिवेशनात प्रश्न मांडला पण मुख्यमंर्त्यांनी सभागृहाला खोटी माहिती दिली. काँग्रेस यासंदर्भात मुख्यमंर्त्याविरोधात विशेषाधिकार प्रस्ताव आणेल. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्याऱ्यांना सोडणार नाही. मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक समाजावर भाजपा सरकार अत्याचार करत आहे. काँग्रेस या अत्याचाराविरोधात आवाज उठवून पीडित कुटुंबांना न्याय देण्याचे काम करेल, असेही पटोले म्हणाले

यावेळी राहुल गांधी यांच्याबरोबर महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, आ. विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, आ. अमित देशमुख, यशोमती ठाकूर, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, खा. प्रणिती शिंदे, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड, खा. रविंद्र चव्हाण, खा. संजय जाधव, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे आदी अपस्थित होते, परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी मंत्री सुरेश वरपुडकर, परभणी शहराध्यक्ष नदीम इनामदार आदि उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर भुजबळ दिल्लीला रवाना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळात वर्णी न लागल्याने नाराज असलेले राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आज, सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीवरून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या भेटींनंतर भुजबळांनी पत्रकार परिषद घेत आपली पुढची भूमिका स्पष्ट केली आहे. छगन भुजबळ आणि समीर भुजबळ आज,सोमवारी सकाळी १०.३० वाजता मुंबईतील सागर यावेळी त्यांनी सुमारे ४० मिनीटे मुख्यमंर्त्याशी चर्चा केली. या भेटीत नेमकी कुठल्या विषयांवर चर्चा याची माहिती छगन भुजबळ यांनी माध्यमांनी दिली आहे. छगन भुजबळ म्हणाले की, मी आणि समीर भुजबळ आम्ही मुख्यमंर्त्यांची भेट घेतली. त्यांच्याबरोबर अनेक गोष्टींवर चर्चा झाली.

सामाजिक, राजकीय मुद्यांवर बोललो. काय काय घडले, काय चालू आहे. त्याबाबत चर्चा झाली. हे आपण मान्यच करायला हवे. की जो महाविजय मिळाला आहे. त्यामागे ओबीसींचे पाठबळ मोठ्या प्रमाणावर राहिले आहे. त्याचाही वाटा आहे. इतर गोष्टींचा वाटा आहे. ओबीसींनी महायुतीला आशीर्वाद दिला. त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजे. ओबीसींचे नुकसान फडणवीस होऊ देणार नाही. पण आता जे काही राज्यात सुरू आहे. येत्या ८ ते १० दिवसात आपण पुन्हा भेटू आणि एक चांगलामार्ग शोधून काढू, असे फडणवीस म्हणाले. तसेच मला विनंती आहे की, ओबीसी नेत्यांना सांगा. मी साधकबाधक विचार करत आहे.

हा निरोप ओबीसी आणि ओबीसींना पाठबळ देणाऱ्या घटकांना द्या, असे फडणवीस म्हणाल्याचे भुजबळांनी सांगितले. दरम्यान भाजप प्रवेशावर भुजबळांनी स्पष्ट बोलण्याचे टाळले. त्यानंतर ते दिल्लीला रवाना झाले. दिल्लीत जाऊन कुणाला भेटणार, दिल्लीवारीचे प्रयोजन काय याबाबत गोपनियता पाळण्यात आलीय.

## वाल्मिक कराड माफिया, धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या; राहुल गांधींचा दौरा अन् नाना पटोलेंची मागणी

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरुन यंदाचे हिवाळी अधिवेशन चांगलेच गाजले. या अधिवेशनात मुख्यमर्त्यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले असून कुणालाही सोडणार नसल्याचे म्हटले. मात्र, याप्रकरणी सातत्याने वाल्किम कराड यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्याची मागणी केली जात आहे.



दुसरीकडे परभणीमधील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणावरुनही संताप व्यक्त होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते व लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज परभणीतील पीडित सोमवंशी कुटुंबीयांची भेट घेणार आहेत. त्यासाठी, आज नांदेड विमानतळावर उतरुन ते परभणीला जातील, त्यासाठी विमानतळावर काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीतला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवर दाखल झाले आहेत. यावेळी, नांदेड येथून पत्रकारांशी संवाद साधताना नाना पटोले यांनी बीडच्या घटनेवरुन मंत्री धनंजय मुंडेंचा राजीनामा मागितला आहे.

बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन राज्यातील वातावरण तापलं असून मराठा क्रांती मोर्चाने देखील तीव्र शब्दात संताप व्यक्त केला आहे. तसेच, मंत्री धनंजय मुंडेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, अशा मागणीचे निवेदनही बारामतीमधील मराठी क्रांती मोर्चाच्या सदस्याने दिले आहे. आता, काँग्रेस नेते नाना पटोले यांनीही धनंजय मुंडेंच्या राजानाम्याची मागणी केली आहे. अजित पवारांवर ज्यावेळेला आरोप झाले , तेव्हा अजित पवारांना देखील मंत्रिमंडळातून बाहेर काढण्यात आले होते. मुख्यमंत्री आणि अजित पवारांनी धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून काढून चौकशी झाली तरच संतोष देशमुख यांना न्याय मिळेल, असे पटोले यांनी म्हटले आहे.

## संतोष देशमुख हत्याप्रकरणी मंत्री संजय शिरसाट बीडमध्ये, नवनीत कॉवत यांच्याशी चर्चा; २८ डिसेंबरची डेडलाईन



**बीड/प्रतिनिधी :** बीड मधील मस्साजोग प्रकरणाने राज्यभर मोठी खळबळ उडाली असून विरोधकांनी आक्रमकपणे मुद्दा लावून धरलाय. बीड जिल्ह्यातील मसाजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून यंदाचा हिवाळी अधिवेशन हे चांगलेच गाजले. यादी बसनात मुख्यमंर्त्यांनी सखोल चौकशीच्या आदेश दिल्या असून कोणालाही सोडणार नसल्याचे म्हटले. दरम्यान बीडमध्ये या प्रकरणावरून राजकीय घटनांना वेग आलाय. मंत्री संजय शिरसाट यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेत त्यांच्या पोलीस तपासाबाबत आढावा घेतलाय. नवनीत कोवत यांच्याशी चर्चा करत या प्रकरणाच्या तपासासाठी २८ डिसेंबरची डेडलाईन असून तोपर्यत आरोपीला अटक केली जाईल असे संजय शिरसाठ म्हणालेत.

ते म्हणाले, संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज एसपी भेट घेऊन त्यांचा तपास कोणत्या मार्गाने चालू आहे त्याची सुद्धा चौकशी केली. एसपीनेसुद्धा मला सांगितले की यात जे काही गुन्हेगार आहेत. त्यांच्या मार्गावर आम्ही आहोत. दोन ते तीन दिवसांमध्ये आरोपी अटक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. २८ डिसेंबरच्या अगोदर हे आरोपींना अटक केली जाईल असं एकंदरीत एसपीच्या बोलण्यावर मला जाणवलय. त्याचे फोटोग्राफ जरी आपण सर्वांनी पाहिलेले आहेत. अशा प्रकारे कोणता आरोपी निर्ढावलेला असेल, त्याला असं वाटत असेल की कायद्यापेक्षा मी मोठा आहे. तर त्याला त्याची जागा दाखवली जाईल आणि सरकारचीसुद्धा तीच भूमिका आहे. असं शिरसाट म्हणाले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरुन यंदाचं हिवाळी अधिवेशन चांगलंच गाजलं. या अधिवेशनात मुख्यमर्त्यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले असून कुणालाही सोडणार नसल्याचे म्हटले. मात्र, याप्रकरणी सातत्याने वाल्मिक कराड यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्याची मागणी केली जात आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन राज्यातील वातावरण तापलं असून मराठा क्रांती मोर्चाने देखील तीव्र शब्दात संताप व्यक्त केला आहे. तसेच, मंत्री धनंजय मुंडेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, अशा मागणीचे निवेदनही बारामतीमधील मराठी क्रांती मोर्चाच्या सदस्याने दिले आहे. आता, काँग्रेस नेते नाना पटोले यांनीही धनंजय मुंडेंच्या राजानाम्याची मागणी केली आहे. अजित पवारांवर ज्यावेळेला आरोप झाले , तेव्हा अजित पवारांना देखील मंत्रिमंडळातून बाहेर काढण्यात आले होते.


## विमानतळ रनवे रिकार्पेटिंगच्या कामात दिरंगाई, नितीन गडकरी गरजले! अधिकाऱ्यांना अल्टिमेटम, जनतेची माफी

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर विमानतळ रनवे रिकार्पेटिंगच्या कामात दिरंगाई होत असल्याचे पुढे आले आहे. यामुळे नागपूरातील प्रवाशांना अतिरिक्त विमान तिकिटाचे दर द्यावे लागतात. परिणामी मी नागपूरच्या जनतेची माफी मागतो, असे म्हणत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. तसेच एक महिन्यात काम पूर्ण करण्याचे कंत्राटदाराला निर्देश दिले आहे. किंबहुना काम वेळेत न केल्यास संबंधीत कंपनीला ब्लॅकलिस्ट करणार असल्याचा इशाराही नितीन गडकरी यांनी दिला आहे.

**तीन किमीच्या रनवेसाठी दीड वर्षे कसे लागतात?- नितीन गडकरी**

मुंबई दिल्ली महामार्ग १३७० किमीचा एक लाख कोटींचा रस्ता मी दोन वर्षात केला आणि तीन किमीच्या रनवेसाठी दीड वर्षे कसे लागतात, हे हास्यास्पद आहे. २०२४ च्या मे महिन्यात के जी गुप्ता या कंपनीला काम देण्यात आले. यात रनवे रिकार्पेटिंगचं काम देण्यात आले. मात्र कंत्राटदाराकडे पुरेशी मशिनरी नाही. हे केवळ एक आठवड्याचे काम आहे. रनवे रिकार्पेटिंगच्या कामामुळे विमान कंपन्यांनी शेड्युल बदलले, त्यामुळे विमानात तिकिटाचे दर वाढले आहेत. याबाबत विमानतळ अधिकाऱ्यांशी बोललो त्यावेळी ते म्हणाले की त्यांच्यामुळे तिकीटं वाढले. निवडणूकीमुळे वेळ लागल्याचंही त्यांनी सांगीतलं. पण यासाठी केवळ १० दिवस गेले आहेत.



**कामावर लक्ष ठेवायला एक कमिटीची नेमणूक- नितीन गडकरी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळावरील धावपट्टीच्या सुधार कार्याची एअरपोर्ट ऑथोरिटी आणि मिहानच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पाहणी केली. गेल्या अनेक दिवसांपासून विमानतळ धावपट्टीचे काम प्रलंबित आहे. नागपूरमधील उड्डान सेवांवर याचा परिणाम होत असून प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे लवकरात लवकर धावपट्टीचे काम पूर्ण करण्याचे निर्देश या वेळी अधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, या कामावर लक्ष ठेवायला मी एक कमिटी नेमली आहे. यावेळी मी धावपट्टीची पाहणी केली. हे विमानतळ लवकरंच नविन कंपनीला हस्तांतरित होणार, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे रनवे रिकार्पेटिंगच्या कामाला वेळ लागला असेही नितीन गडकरी म्हणाले.

## बांगलादेशी नागरीक अवैधरित्या भारतात घुसखोरी करुन धुळे शहरात लॉजवर; स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घेतले ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील न्यु शेरेपंजाब लॉज मधील रूम नं.१२२ मध्ये वैध कागदपत्राशिवाय बेकायदेशिररित्या परदेशी राहत असल्याबाबत गोपनिय बातमी मिळाली होती. या माहितीचे गांर्भीय ओळखुन धुळे स्थानिक गुन्हे शाखा यांनी परदेशी नागरीकांना ताब्यात घेणे बाबत सूचना देण्यात आल्या होत्या.



धुळे शहरातील जुना आग्रा रोडवरील न्यु शेरेपंजाब लॉज येथे जावुन रुम नं.१२२ याठिकाणी तपासणी केली असता याठिकाणी , (१) महंमद मेहताब बिलाल शेख, वय-४८ वर्ष, (२) शिल्पी बेगम महंमद बेताब शेख, वय-४३ वर्ष, दोन्ही रा. मानकुर इंदिरानगर रहीवासी सेवक अंगणवाडी बनिकर मैदान इंदिरानगर, हाऊस नं. १८५, ग.नं.३, मुंबई मुळ रा. चरकंदी पो. निलुखी पोलीस ठाणे सिपचर जि.महिदीपुर (बांगलादेश) (३) ब्युटी बेगम पोलस शेख, वय-४५ वर्ष, रा.ग.नं.ए/५५, पलकपुर, दिल्ली मुळ रा.बेहेनातोला पोंलीस ठाणे सिपचर, जि.महिदीपुर (बांगलादेश) व (४) रिपा रफीक शेख, वय-३० वर्ष, रा.३०२, कबीर वस्ती, रोशन वाली गल्ली, दिल्ली मुळ रा. श्रीकृष्णादी पो. कबीरस्पुर पोलीस ठाणे, राजुर जि.महिदीपुर (बांगलादेश) असे मिळुन आले.

धुळे पोलिसांनी त्यांची विचारपुस केली असता, त्यांनी महंमद शेख व शिल्पी बेगम हे पती-पत्नी असुन, नमुद महिला मुबोली बहिणी असल्याचे सांगुन चारही बांगलादेशी नागरीक असल्याचे सांगीतले. बेरोजगारीला कंटाळुन कोणतेही वैध प्रवासी कागदपत्रा शिवाय व मुलकी अधिकारी यांची परवानगी न घेता घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करुन शेर पंजाब येथे राहुन, धुळे शहरात मिळेल त्या ठिकाणी कामधंदा करण्यासाठी कायम राहण्यासाठी घराचा शोध घेत असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले.

पोलिसांनी त्यांचे ताब्यातुन ४०,०००/- रु. किंमतीचे चार मोबाईल ताब्यात घेण्यात आले आहेत. त्यांचेकडे बांगलादेशी असल्याचे कोणतेही वैध पासपोर्ट व व्हिसा आढळुन आले नाहीत. त्यांचे नातेवाईकांशी बोलण्याकरिता आयएमओ हे ॲप वापरत होते. असल्याचे देखील समोर आले आहे.

## नवी मुंबईमध्ये वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांवर गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई



**नवी मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून नवी मुंबईच्या विविध भागात वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांची धरपकड सुरू आहे. गुन्हे शाखेकडून बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करण्यात आली आहे. यावेळी खारघर येथील कोपरा येथून चार बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये एक पुरुष व तीन महिला यांचा समावेश आहे. यावेळी या नागरिकांकडे कोणतेही भारतीय नागरिकत्व किवा पूरवा मिळून आला नसल्याने पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. त्याचसोबत खारघर पोलीस ठाण्यात बांगलादेशी नागरिक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच वाशीच्या एपीएमसी परिसरात छापा टाकला असता एक पुरुष व पाच महिला या बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तर एपीएमसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान यामध्ये नवी मुंबई परिसरातून एकूण ८ महिला व २ पुरुष यांना ताब्यात घेतलं असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CMYK

## साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची जयंती. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

# तालुका क्रीडा संकुल मधील १ कोटी २० लाखाच्या विकास कामांचे संजय रायमुलकर यांच्या हस्ते भूमिपूजन

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** येथील तालुका क्रीडा संकुलातील संरक्षण भिंत बांधकाम आणि बॅडमिंटन हॉल दुरुस्ती या एक कोटी २० लाख रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमिपूजन माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते आज पार पडले. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, शिवसेनेचे शहर प्रमुख जयचंद बाठीया प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

भूमिपूजन कार्यक्रमानंतर बोलताना माजी आमदार संजय रायमुलकर म्हणाले की, मेहकर तालुका क्रीडा संकुलासाठी चार कोटी रुपये ,आणि लोणार साठी चार कोटी रुपये यापूर्वीच मी मंजूर करून आणले असून त्यापैकी मेहकर येथे एक कोटी वीस लाखांच्या विकास कामांचे भूमिपूजन झाले. खेळाडूंसाठी विशेष धावपट्टी आणि संकुलाचे सौंदर्यीकरण, त्याचप्रमाणे प्रेक्षक गॅलरी निर्माण करणे, मैदानाचे सपाटीकरण आदी कामे करावयाची असून त्यासाठी निधीची कुठलीही कमतरता भासू दिली जाणार नाही. राज्याचे क्रीडामंत्री दत्ता भरणे यांच्या माध्यमातून आणखी कामे मंजूर करून घेतली जातील. क्रीडा संकुलात देखभालीसाठी कर्मचारी होता ,परंतु अल्पमोबदला मिळत असल्याने सध्या कर्मचारी नाही. याबाबत क्रीडामंत्री यांच्याकडून नियुक्ती करून घेतली जाईल.

यावेळी शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख समाधान साबळे, युवासेनेचे तालुकाअध्यक्ष भूषण घोडे, सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष अरुण दळवी ,माजी नगरसेवक रविराज रहाटे ,समाधान सास्ते ,तौफिक कुरेशी ,मनोज जाधव ,रामेश्र्वर भिसे आणि संतोष चनखोरे ,राजीव काटे ,मोहन पिटकर, विनोद पह्राड,गजानन पाटील ,तनशीराम मानघाले, तुळशीराम मानघाले, संतोष वायाळ,मदन मानघाले, आकाश ढोरे, भिवाजी ढोरे, हर्षल गायकवाड, सरपंच रतन मानघाले, धनंजय मानघाले, दीपक मानघाले, श्याम इंगळे, शिव वायाळ, गजानन मानघाले, सागर मानघाले, हर्षल गायकवाड, ललित रहाटे,मुजीबभाई ,सुभाष खुरद ,वसंत सोनुने, प्रमोद वायाळ, गजानन देशमुख, आदिनाथ पोपळघट, संदीप मानघाले, अंकुश मानघाले, सुनील राऊत ,गजानन सोनुने, पिंटू ठाकूर, शुभम सोनुने, सतीश सोनुने, वरूण अवस्थी, नितीन गारोळे ,योगेश सौभागे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# शुक्रिया, मेहरबानी, करम दारू सोडल्यानंतर ८ वर्षांनी पूजा भट्ट हे बोलली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूड चित्रपटांमधून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणारी पूजा भट्ट अनेकदा सोशल मीडियाच्या माध्यमातून तिच्या चाहत्यांशी जोडलेली असते. यावेळी ती तिच्या आयुष्याशी संबंधित खास माहिती लोकांसोबत शेअर करते. अभिनयासोबतच ती वडील महेश भट्ट यांच्यासारखी चित्रपट निर्माती देखील आहेत. चित्रपटांबद्दल बोलायचे झाले, तर पूजाने 'डॅडी', 'दिल है की मानता नहीं' आणि 'सडक' यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. नुकताच पूजाने तिच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर एक फोटो पोस्ट केला आहे.



सेल्फी पोस्ट करताना पूजा भट्टने सांगितले की, तिने आठ वर्षांपूर्वी दारू सोडली होती. तिने लिहिले, आज मी दारू सोडल्याला आठ वर्षे पूर्ण होत आहेत. शुक्रिया, मेहरबानी, करम. या पोस्टसोबत तिने स्कॉटिश लेखक जोहान हॅरीच्या काही ओळीही शेअर केल्या आहेत. तिने लिहिले, तू एकटी नाहीस, आम्ही तुझ्यावर प्रेम करतो. अमली पदार्थांच्या व्यसनाधीन व्यक्तींशी सामाजिक, राजकीय आणि वैयक्तिकरित्या असे वागले पाहिजे.

पूजाने पुढे लिहिले की, आम्ही शंभर वर्षांपासून अंमली पदार्थांच्या आहारी गेलेल्यांसाठी युद्धगीते गात आहोत. मला असे वाटते की आम्हाला नेहमीच त्याच्यासाठी प्रेमगीते गाण्याची इच्छा होती. कारण व्यसनाधीनतेचा विपरीत संबंध वर्ज्य नसून व्यसनाचा विपरीत संबंध आहे – जोहान हॅरी. पूजाने या पोस्टद्वारे खुलासा केला की, ती अमली पदार्थांच्या विळख्यात अडकली होती, मात्र आता ती यातून पूर्णपणे बाहेर आली आहे.

पूजा भट्टने तिच्या दारूच्या व्यसनाबद्दल अनेकदा उघडपणे बोलले. व्यसनाच्या जाळ्यात ती अडकली होती आणि त्यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ते स्वतः स्वीकारणे, असे तिने सांगितले होते. तेव्हापासून त्याने दारू पिणे बंद केले. तिच्या पोस्टवर अनेक सकारात्मक प्रतिक्रिया आल्या असून तिचे कौतुकही झाले आहे.

# परळी येथील शिवभोजन चालकाने दिव्यांग व्यक्तीला केलेल्या मारहाणीच्या निषेधार्थ जालन्यात दिव्यांगांचे निषेध आंदोलन

**जालना/प्रतिनिधी :** परळी येथे शिवभोजन केंद्रामध्ये जेवण करण्यासाठी आलेल्या दिव्यांग व्यक्तीला शिवभोजन चालकाच्या वतीने मारहाण झाल्याची घटना घडली होती. या घटनेवरून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दिव्यांगांच्या विविध संघटनांच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात येत असून आज दिनांक २३ सोमवार रोजी दुपारच्या सुमारास जालन्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर दिव्यांग बांधवांनी ने निषेध व्यक्त केला आहे. जिल्हाभरातील विविध संघटनातील दिव्यांग बांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर निषेध मोर्चा काढला.

यावेळी सदरील शिवभजन केंद्र चालकाचे शिवभोजन लायसन्स रद्द करावे तसेच दिव्यांग हक्क अधिकार अधिनियम अंतर्गत कारवाई करण्याची मागणी दिव्यांग बांधवांच्या वतीने करण्यात आली.

# मंत्रिपद जाताच केसरकरांना आणखी एक धक्का; गणवेशानंतर वह्यांची पाने जोडण्याचा निर्णयही रद्द होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना नेते आणि माजी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना यंदा महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात स्थान देण्यात न आल्याने ते काहीसे नाराज झाले आहेत. त्यातच, गेल्याच आठवड्यात दीपक केसरकर यांनी घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शालेय गणवेश योजनेच्या निर्णयात बदल करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यावरुन, केसरकर यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. तसेच, हा निर्णय घेण्यापूर्वी माझ्याशी चर्चा तरी करायला हवी होती, असे म्हटले होते. आता, केसरकर यांनी घेतलेल्या आणखी एका निर्णयात बदल करण्यात येणार असल्याचे सम जते. राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर झाले असून शालेय शिक्षणमंत्रीपदाचा पदभार दादा भुसे यांच्याकडे देण्यात आला आहे. त्यानंतर, आता पुस्तकाला वह्यांची पाने जोडण्यात आलेल्या निर्णयावर राज्य सरकारकडून फेरविचार सुरू असल्याची माहिती आहे.

पुस्तकाला वह्याचीपाने जोडणाऱ्या निर्णय रद्द होण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून नव्या शालेय शिक्षण मंत्र्यासोबत चर्चा करून निर्णय घेणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. एक राज्य एक गणवेश या निर्णयात बदल केल्यानंतर आता पुस्तकाला वह्यांची पाने जोडण्याचा निर्णयावर सुद्धा फेरविचार सुरू झाला आहे. सन २०२३– २४ या शैक्षणिक वर्षापासून पुस्तकाला वह्याची पाने जोडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जेणेकरून दप्तराचे ओझे कमी होईल, याशिवाय शिक्षकांकडून वर्गात शिकवलं जात असताना विद्यार्थ्यांकडून वह्यांमध्येच याच्या नोंदी घेतल्या जातील, असा उद्देश त्यावेळी सांगण्यात आला होता. मात्र, ज्याप्रकारे तज्ज्ञांकडून आणि काही अधिकाऱ्यांकडून या निर्णयासंदर्भात काही सूचना येत आहेत, हे पाहता या निर्णयावर फेरविचार केला जात असल्याची माहिती आहे.

पुस्तकाला वह्यांची पाने छापण्याआधी ज्याप्रकारे कुठलीही वह्यांची पाने न जोडता पुस्तके छापली जायची, तशाच प्रकारची पुस्तके पुन्हा छापण्यासंदर्भात विचार केला जात आहे.नवे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्यासोबत चर्चा करून यावर शासन निर्णय जारी केला जाईल अशी माहिती आहे.










DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### ठाण्यातील कशेळी येथील आकृती रुग्णालयात भारतीय क्रिकेट संघाचे माजी खेळाडू विनोद कांबळी यांना उपचारासाठी केले दाखल




दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील कशेळी येथील आकृती रुग्णालयात भारतीय क्रिकेट संघाचे माजी खेळाडू विनोद कांबळी यांना उपचारासाठी दाखल केले आहे. दोन दिवसांपूर्वी चक्कर येऊन ते पडले होते त्यानंतर तपासणी केली असता त्यांना कावीळ व त्यांना व्हायरल इन्फेक्शन असल्याचे समजले तसेच मेंदूला देखील थोड्याफार प्रमाणात सूज आल्याने डॉक्टरांनी त्यावेळी सांगितले. त्यामुळे त्यांना गेले दोन दिवसापासून ॲडमिट करण्यात आले असून सध्या त्यांचे प्रकृती ठीक आहे अजून पाच ते सहा दिवसानंतर ते पूर्ववत होतील असा अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे

डॉक्टर माझ्यासाठी देव आहेत, मरणाच्या दारातून मी आलो आहे, मी पुन्हा उभा राहील आणि पुन्हा लवकरच क्रिकेटच्या मैदानात दिसेल, मी अजून मेलो नाही,जिवंत आहे आणि मरणारही नाही, मी सचिन तेंडुलकर सोबत पुन्हा क्रिकेट खेळताना दिसेन, सचिन तेंडुलकरला देखील माझा हाच निरोप आहे.

### कल्याण पुर्वेत महेश गायकवाड यांच्या कमानीवर एकनाथ शिंदे व श्रीकांत शिंदे यांचे फोटो



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण पूर्वेत महायुतीचे बंडखोर उमेदवार महेश गायकवाड पुन्हा चर्चेत आले आहेत. त्यांनी आयोजित केलेल्या 'कल्याण महोत्सव २०२४' च्या बॅनरवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांचे फोटो झळकल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यामुळे त्यांच्या शिवसेनेत (शिंदे गट) पुनःप्रवेश होणार का, अशी चर्चा रंगली आहे.

### मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी खासदार उदयनराजेंनी घेतली भेट



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :**राज्याच्या मंत्रिमंडळात साताऱ्याच्या राजघराण्यातील श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांना सार्वजनिक बांधकाम खाते मिळाल्यानंतर त्यांनी आज आपले थोरले बंधू खासदार उदयनराजे भोसले यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. आपला धाकटा भाऊ मंत्री झाला असून आपल्याला खूप आनंद झाला आहे असे म्हणत खा.उदयनराजे भोसले यांनी त्यांना शुभ आशीर्वाद दिले तर साताराचे पालकमंत्री पद देखील माझे बंधू मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना मिळेल अशी अपेक्षा या वेळेला बोलताना व्यक्त केली.

### जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समृद्धी बाधित शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जालना ते नांदेड समृद्धी महामार्ग बाधित शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन केलंय.. भूसंपादनाच्या मावेजा संदर्भात १९ नुसार सर्व शेतकर्यांना नोटीस देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये बाधित शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मावेजाचा समावेश होता. मात्र हा मावेजा अत्यंत कमी निश्र्चित करण्यात आला आहे. त्यामुळं शेतीच्या दरापेक्षाही कमी दर शेतकऱ्यांना परवडणारा नाही. त्यामुळे महामार्गाच्या भूसंपादनाला विरोध पुन्हा नव्यानं जमिनीचे मुल्यांकन करण्यात यावे. अशी मागणी शेतकर्यांनी केली असून यासाठी शेतकर्यांनी जिल्हाधिकार्यालासमोर धरणे आंदोलन केलंय.

# अमित शहांच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचे जोरदार आंदोलन

दैनिक आपला विदर्भ





**ठाणे/प्रतिनिधी :** आंबेडकर... आंबेडकर असे म्हणणे फक्शन झाली आहे, असे विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले होते. त्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. जितेंद्र आव्हाड, शिवसेना, नेते राजन विचारे यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीने ठाणे स्टेशन परिसरात जोरदार निदर्शने केली. या प्रसंगी, डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी, आंबेडकर हे नाव आमची पॅशन आहे. अमित शहा हे ज्या पक्षात आहेत त्यांच्या मातृसंस्थेने संविधानाला विरोध केला होता. आता शहांच्या विधानाने भाजपच्या मनात काय आहे, ते उघडकीस आले आहे, अशी टीका केली.

राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष, काँग्रेस, शिवसेना, आप, सपा आदी पक्षांनी ठाणे स्टेशन परिसरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर अमित शहा यांच्या निषेधार्थ आंदोलन केले. याप्रसंगी आंदोलकांनी मोदी - शहा यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तडीपार तो तडीपार, त्याला काय समजणार घटनाकार, संविधान आमचा अभिमान, डॉ बाबासाहेब आंबेडकर हमारे भगवान, अमीत शहा मुर्दाबाद अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

जितेंद्र आव्हाड या प्रसंगी, परभणीत संविधान प्रतिकृतीची मोडतोड करणारा माणूस विकृत होता, असे मुख्यमंत्री सांगत असतील तर संसदेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणाऱ्यास काय म्हणाल, असे पत्रकारांनी विचारले असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आम्ही हृदयातून घेत असतो. आमच्यासाठी ते नाव पॅशन आहे. कारण, त्यांच्यामुळेच आम्हा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला. स्वर्ग आणि नरक कुणीच पाहिलेले नाही. मात्र, इथल्या नरकातून माणुसकीचा स्वर्ग बाबासाहेब आंबेडकर यांनीच आम्हाला दाखविला आहे. अमीत शहा यांच्या विधानातून भाजपच्या मनात काय आहे, हे पुन्हा स्पष्ट झाले आहे. १९५० साली भाजपच्या मातृसंस्थेने संविधानाला विरोध केला होता. आजही त्यांना मनातून संविधान नको आहे. म्हणूनच ते अशी विधाने करीत आहेत.

यावेळेस राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख केदार दिघे, रचना वैद्य, राहुल पिंगळे, रवी कोळी, राजेश साटम, राजेश कदम यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### सूर्यवंशी कसा मेला? राज्यभर बॅनर लावून प्रश्न विचारणार

सोमनाथ सुर्यवंशीला न्याय मिळणार का? असे विचारले असता, या सरकारला सोमनाथ सुर्यवंशीला न्याय द्यायचाच नाही. जे सरकार सुर्यवंशीचे निधन कसे झाले ते सांगायला तयार नाही. ते सरकार न्याय कसा देणार? आपण पहिल्या दिवसापासून हाच प्रश्न विचारत आहोत. आता आम्ही राज्यभर सुर्यवंशी कसा मेला असा प्रश्न विचारणारे बॅनर लाव, असे डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले.

# जागतिक शेतकरी दिन साजरा होत असताना मात्र, जगाचा पोशिंदा शेतकरी अडचणीत



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शेतकरी हा जगाचा पोशिंदा म्हणून आजपर्यंत ओळखला जातो. मात्र हाच शेतकरी आता अडचणीत सापडला आहे. गेल्या काही वर्षांपासून अवकाळी पडणारा पाऊस, दुष्काळ यामुळे अडचणीत असतो. या संकटाच्या परिस्थितीत राबराब राबवून शेतकरी उत्पन्न मिळवतो. अहोरात्र काम करून घाम गाळून काढलेल्या पिकाला भाव मिळत नाही. या सगळ्या परिस्थितीमुळे शेतकरी कर्जबाजारी होतो आत्महत्या शिवाय त्याला पर्याय नसतो. आज जागतिक शेतकरी दिवस आहे. जागतिक शेतकरी दिनानिमित्त सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव द्यावा अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

### भिवंडी कम्युनिस्ट पक्षाच्यावतीने निर्दशने



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राज्यसभेत संविधानावरील चर्चेदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी केलेल्या वादग्रस्त विधानाचा भिवंडीत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला असून या विरोधात जोरदार घोषणा करत अमित शाह यांनी राजीनामा घ्यावा, अशी मागणी देखील यावेळी कार्यकर्त्यांनी केली. यावेळी संसदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला. यानंतर प्रमुख पदाधिकाऱ्यांनी यांच्या शिस्तमंडळाने उपविभागीय यांच्याकडे निवेदन दिले आहे.

### जालन्याचे पालकमंत्रीपद हे शिवसेनेकडे द्यावे,शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ



**जालना/प्रतिनिधी :** जालन्याचे पालकमंत्री पद हे शिवसेनेकडे द्यावे अशी मागणी शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांनी केली आहे. मात्र हा सर्वस्वी अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे ते ज्यांना पालकमंत्री पद देतील ते आम्ही स्वीकारु असं खोतकर यांनी म्हंटलंय. त्याचबरोबर समृद्धी महामार्गाला काही शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. त्याबाबत एकनाथ शिंदे आणि संबंधीत विभागाचे मंत्री यांच्यासोबत शेतकऱ्यांची एक बैठक लावण्यात येईल असंही खोतकर यांनी म्हंटलं आहे.

# आ. हेमंत पाटील यांच्या मध्यस्तीने शेतकऱ्यांचे आंदोलन स्थगित






दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** आज नांदेड परभणी जालना ह्या समृध्दी महामार्गातील बाधीत शेतकऱ्याच्या मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेती दिनी शकडो शेतकरी आंदोलन करत होते. ह्या आंदोलना शिवसेनेचे विधानपरिषदेचे गट नेते आ. हेमंत पाटील यांनी भेट देत मध्यस्ती केली व प्रशासनाने मावेजात दुजाभाव केला असून यात बागयदार व जिरायतदार शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून आपले आंदोलन हे आपण थांबवावे हि विनंती केली असून जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्या मध्ये उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन त्यांच्या सोबत बैठक लावुन चार पट्ट मावेजा मिळवून देण्याचा शब्द दिला असल्याचे ते म्हणाले व सदरील आंदोलन शेतकर्यांनी मागे घेतले.

# नागरे महाविद्यालयात रेड रिबन क्लबद्वारे HIV-AIDS तपासणी, जनजागृती शिबिर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप







**बिबी :** दिनांक २३ डिसेंबर २०२४ रोज सोमवारला दुसरबीड येथे नारायणराव नागरे महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रेड रिबन क्लब दवारे HIV -AIDS तपासणी वजन जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले समाजामध्ये एच . आय . व्ही . या आजाराचा संसर्ग मोठ्या प्रमाणात होत असल्याने त्या संदर्भात जनजागृती करण्याच्या उद्देशाने त्यावरती आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयामध्ये रेड रिबन क्लब स्थापन करून यामध्ये ११ विद्यार्थिनी आणि १० विद्यार्थी अशी २१ विद्यार्थ्यांची समिती स्थापन करून या समितीच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये जनजागृती तसेच विद्यार्थ्यांचे रक्त चाचणी करण्यात आली.

या टेस्ट मध्ये एकूण ७२ विद्यार्थ्यांनी टेस्ट केली यात ४८ विद्यार्थीनी व २४ विद्यार्थी होते. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विजय नागरे (अधिसभा सदस्य व व्यवस्थापन परिषद सदस्य अमरावती विद्यापीठ अमरावती) हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते तसेच सिंदखेडराजा ग्रामीण रुग्णालय येथील आरोग्य कर्मचारी रविंद्र मवाळ साहेब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा. डॉक्टर दीपक देशमाने सहकार्य अधिकारी प्रा. कु. नयना गवारे प्रा. देवानंद नागरे प्रा. जगदीश यादव प्रा. शिंदे भगवान सूत्रसंचालन व प्रस्तावना प्रा. मिलिंद गवई यांनी केले तसेच या कार्यक्रमाचे आभार प्रा. सत्यम श्रीवास्तव यांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### नागपूरात रोजगार मेळाव्याचे आयोजन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दिले जाणार नियुक्ती पत्र




दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरात देखील रोगजार मेळाव्याचे आयोजन केंद्रीय रिजर्व पोलिस बल कॅम्प हिंगणा येथे आयोजित करण्यात आले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उमेदवारांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात येणार आहे. २५७ उमेदवारांना हे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात येणार असून यात सीआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, आसाम रायफल, एसएसबी, रेल्वे, पोस्ट डिपार्टमेंट, बँक आदी विभागातील उमेदवारांना हे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

### कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर हे मंगळवारी दि. २४ डिसेंबर रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दुपारी १२ वाजता ब्रम्हांडनायक लॉन शेगाव रोड, खामगाव येथे आगमन व बैठक, त्यानंतर सोईनुसार अकोलाकडे प्रयाण करतील.

### वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे श्रींच्या चरणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळातील मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर राज्याचे वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांचे पहिल्यांदा जिल्ह्यात आगमन झाले. या दौऱ्यात त्यांनी सहकुटुंब शेगाव येथील श्री संत गजानन महाराज मंदिर येथे श्रींचे दर्शन घेतले.

श्रींचे दर्शन घेतल्यानंतर संस्थानच्या वतीने मंत्री श्री सावकारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्यासोबत प्र. जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, संस्थानचे विश्वस्त, सेवेकरी उपस्थित होते.

### सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी परवानगी पेक्षा तिप्पट झाडांची कत्तल केल्याचा पीपल्स रिपब्लिकन पार्टी आरोप







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा व्हावा यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. त्यामध्ये राज्यात विविध ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम सध्या जोरात सुरू असून बुलढाणा जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील देऊळगाव धनगर, कालोना शिवारामध्ये या प्रकल्पाचे काम सुरू असताना परवानगीपेक्षा अधिक झाडाची कत्तल केली जात असल्याचा आरोप पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष विजय गवई यांनी केला आहे. अवैध्य कत्तल करणाऱ्या संबंधित व्यक्तीवर चौकशी करून कारवाई करण्यात यावी, त्याचबरोबर दोषीला पाठीशी घालणाऱ्या वन विभागातील अधिकाऱ्यावर देखील कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विजय गवई यांनी केली आहे, अन्यथा तीव्र स्वरूपाच्या आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे. तर असा कोणताही प्रकार सुरु नसल्याचे आरएफओअधिकारी अभिजीत ठाकरे यांनी माहिती दिली.

# लोणार ग्रामीण रुग्णालयात रुग्णाचा जळून मृत्यू

## ग्रामीण रुग्णालयात कामावर हजर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची चर्चा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप






**लोणार :** २३ डिसेंबर ला एका रुग्णाचा रुग्णालयात जळून कोळसा होऊन मृत्यू झाल्याची घटना सकाळी तीन वाजून ४५ मिनिटांनी उघडकीस आली आहे.

याबाबत सविस्तर असे की काल २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ग्रामीण रुग्णालयात फोन आला की लोणार बस स्थानकावर अनोळखी व्यक्ती आजारी आहे, सदर व्यक्तीला १०८ नंबरच्या म्बुलन्सने रुग्णालयात चार वाजुन पस्तीस मिनिटांनी मनोरुग्ण हरिभाऊ बापूजी रोकडे वय ६५ वर्ष राहणार पैठण यास दाखल करण्यात आले रात्रीला वैद्यकीय अधिकारी शोएब शहा, कक्षसेवक बळीराम खरात, आधी परिचारिका माने, सुरक्षा रक्षक उद्धव वाटसर यांची ड्युटी होती. सकाळी ३: ४५ मिनिटांनी रुग्णालयाला आग लागल्याची माहिती सुरक्षारक्षकाने रुग्णालयात असलेल्या कर्मचाऱ्यांना दिली, ज्या रुमला आग लागली होती त्या ठिकाणी कर्मचारी पोहोचण्याच्या अगोदरच रुग्णांचा जळून अक्षरशः कोळसा झाला होता, त्यानंतर कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, या ठिकाणी कर्तव्यावर उपस्थित असलेले कर्मचारी रात्रीला झोप लेले असल्यामुळे आग कधी लागली याची त्यांना माहिती झाली नाही कर्मचारी जागे असते तर रुग्णाचा जीव गेला नसता अशी उलट सुलट चर्चा ऐकायला मिळत होती, रुग्ण हा मनोरुग्ण होता व त्यांने बिडी पेटवल्यामुळे आग लागली तर काही कर्मचाऱ्यांनी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचे सांगितले घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश इंगोले पोलीस हेडकॉन्स्टेबल नितीन खराडे हे करीत असून आग नेमकी कशामुळे लागली याचा तपास करीत आहे, रुग्णाच्या नातेवाईकांचा शोध न लागल्यामुळे पोस्टमार्टम केल्यानंतर तहसीलदार यांच्या परवानगीने नगरपालिकेच्या साह्याने रुग्णावर १.१५ मिनिटांनी अंत्यसंस्कार करण्यात आली ची माहिती पोलीस सहाय्यकनिरीक्षक इंगोले यांनी दिली.

# राज्याचे कामगारमंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी घेतले श्रींचे दर्शन







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य मंत्रिमंडळातील मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर राज्याचे कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचे पहिल्यांदा जिल्ह्यात आगमन झाले. या दौऱ्यात त्यांनी प्रथम शेगाव येथील श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासोबत कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

श्रींचे दर्शन घेतल्यानंतर संस्थानच्या वतीने मंत्री ॲड.फुंडकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शेगांवमध्ये त्यांच्या स्वागतासाठी मिरवणूक काढण्यात आली. तसेच बारी समाज विकास मंडळद्वारा आयोजित उपवधू-वर महोत्सवात उपस्थित राहून त्यांनी विवाहासाठी जोडीदार शोधणाऱ्या वधू-वरांना सुखद व यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्यासोबत आमदार डॉ. संजय कुटे उपस्थित होते.

संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यांच्या आशीर्वादाने नवीन जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्यासाठी आत्मबल आणि ऊर्जा मिळाली. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी प्रामाणिक प्रयत्न करत, जनसेवा व लोककल्याणाचा वसा कायम ठेवण्याचा दृढ निश्र्चय व्यक्त केला. शेगावच्या पवित्र भूमीने मला नवचैतन्य आणि प्रेरणा दिली आहे,अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**लोकनेते भाऊसाहेब फुंडकर यांना अभिवादन**

राज्याचे कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज लोकनेते स्व.भाऊसाहेब फुंडकर यांच्या श्री सिध्दीविनायक टेक्निकल कॅम्पसमधील समाधीस्थळाचे दर्शन घेऊन अभिवादन केले.

### दूधगंगा दगडी धरणातील गळती प्रतिबंधक उपाययोजनेच्या कामास माहे जानेवारी २०२५ मध्ये सुरुवात

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** दूधगंगा दगडी धरणातील गळती प्रतिबंधक उपाययोजनेच्या कामास माहे जानेवारी २०२५ मध्ये सुरुवात करुन जून २०२५ अखेर सिंचनाकरिता आवश्यक पाणीसाठ्याचे नियोजन करुन झीळारीू व ीशलेपवरीू ऊीळश्रश्रळपस तसेच र्ङ्गीपींळपस चे काम करावयाचे नियोजन आहे. मागील काही दिवसांपासून धरणाच्या स्थैर्यतेबाबत व गळतीबाबत वृत्तपत्रे, इलेक्ट्रानिक मिडीया व यु-ट्युबवर वस्तुस्थितीशी विसंगत बातम्या देण्यात येत आहेत. या बातम्या प्रसार माध्यमांनी माहितीची शहानिशा न करता दिलेल्या असल्याचे निदर्शनास आले असून काळम्मावाडी (दूधगंगा) धरणाच्या सुरक्षिततेस कोणताही धोका नाही. धरण पूर्णपणे सुरक्षित असून नागरिकांनी प्रसारित बातम्यांवर विश्वास ठेवू नये व घाबरुन जावू नये. या विभागामार्फत उपरोक्त गळती प्रतिबंधक उपाय योजनेच्या कामाचे नियोजन करण्यात आले असून ते काम करण्यात येईल, अशी माहिती दूधगंगा कालवे विभाग क्र.१. च्या कार्यकारी अभियंत्यांनी दिली आहे.

दूधगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील कोल्हापूर व बेळगाव जिल्ह्यातील सर्व शेतकरी, उद्योजक संस्था व नागरिकांना या पत्रकाद्वारे दूधगंगा प्रकल्पाच्या पाणीसाठा व धरण व्यवस्थापनाबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

दूधगंगा प्रकल्प, तालुका राधानगरी, जि. कोल्हापूर अंतर्गत २५.४० अ.घ.फु. क्षमतेचे धरण (मतीचे धरण, वक्र द्वारासहीत सांडवा प्रकार) बांधण्यात आले असून, सन २००६ पासून या धरणात पूर्ण क्षमतेने म्हणजेच २५.४० अ.घ.फु. इतका पाणीसाठा करण्यात येत असून सद्यस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यातील ४१ हजार हेक्टर क्षेत्र सिंचित करण्यात येत आहे व प्रकल्पाच्या आंतरराज्यीय करारानुसार कर्नाटक राज्यास नदी कालवा या माध्यमातून ४ अ.घ.फु. पाणी देण्यात येते.

# ‘सुशासन सप्ताह’ ही अभिनव उपक्रम राबविण्याची संधी






दैनिक आपला विदर्भ

### सुशासन सप्ताहांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सुशासन सप्ताहांतर्गत ‘प्रशासन गांव की ओर’ मोहीम राबविण्यात येत आहे. *‘सुशासन सप्ताह’ ही अभिनव उपक्रम राबविण्याची संधी असून या संधीतून शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहचवा, असे निर्देश प्र.जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांनी विभाग प्रमुखांना दिले.

सुशासन सप्ताहांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात जिल्हास्तरीय कार्यशाळा सोमवारी संपन्न झाली. या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांना शासनाच्या सेवा सहज व सोप्या पद्धतीने उपलब्ध होण्यासाठी प्रशासनातील इतर विभागांनी देखील अभिनव उपक्रम राबवावे. आपल्या विभागांतर्गत अभिनव उपक्रम राबविण्यासाठी सुशासन सप्ताह ही एक संधी आहे. या संधीतून शासनाच्या सेवांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या फॅार्म, रिफॅार्म, परफॅार्म आणि ट्रांसफॅार्म या चतु:सूत्रीचा प्रशासनात अवलंब करावा. आपल्या विभागाशी संबंधित ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या तक्रारी तातडीने निकाली काढाव्यात, असे निर्देश प्र. जिल्हाधिकारी यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिले.

या कार्यशाळेत मोताळा तालुक्यातील वरुड येथील अटल भूजल योजनेंतर्गत झालेली उल्लेखनीय कामे, जिगांव प्रकल्प कार्यालयाकडून प्रकल्पग्रस्तांनी पुरविल्या जाणाऱ्या डिजिटल सेवा, चिखली तहसिल कार्यालयाला प्राप्त झालेल्या आयएसओ मानांकन आणि केंद्रीय आरोग्य मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकृती परीक्षण सारख्या अभिनव उपक्रमांचे सादरीकरण अधिकाऱ्यांनी केले.

# शिरपूर शहरात इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या गोडाऊनमधून चोरी प्रकरणी तिघांना अटक

दैनिक आपला विदर्भ




**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर शहरातून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या गोडाऊन मधून एसी , कुलर चोरी प्रकरणी तीन चोरट्यांना शिरपूर शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. चोरट्यांकडून पोलिसांनी तीन लाखा पेक्षा जास्त किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. शिरपूर शहरातील मारवाडी गल्लीत राहणारे व्यापारी राजेश एकनाथ भंडारी यांचे शहरातील अहिल्या लॉन्स समोरील गोकुळ नगर येथे इलेक्ट्रॉनिक साहित्य ठेवण्यासाठी गोडाऊन आहे. सदर गोडाऊन मधून मागील १ महिना ते दि. १८ डिसेंबर पर्यंत गोडाऊनचा दरवाजा तोडून त्यातुन ३ लाख रूपये किंमतीचे विविध कंपनीचे ६ ए.सी.,२ डि-फ्रिज व ३ कुलर असे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते.याबाबत त्यांनी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलेली होती.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक के. के. पाटील यांनी गुन्हे शोध पथकाच्या मार्फत वेगाने केला. यावेळी त्यांना दिपक ऊर्फ भोल्या दंगल भिल, संदिप दिपक भिल दोन्ही राहणार आमोदा ता.शिरपूर व सुरज अर्जुन भिल रा.रामसिंग नगर यांच्या सोबत इतरांनी चोरी केल्याची माहिती मिळाली.त्यांचा शोध पोलीसांनी घेतला तिन्ही आमोदा गावाचे गेट जवळ आढळून आले. त्यांना पोलीसांनी शिताफीने ताब्यात घेतले. त्यांच्याकडे गुन्ह्याबाबत विचारपूस करता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

संशयित दिपक ऊर्फ भोल्या दंगल भिल याच्याकडून गुन्ह्यात चोरी केलेले २ ए.सी. जप्त केले.सुरज अर्जुन भिल याच्याकडून चोरी केलेले ४ ए.सी. व १ डी-फ्रिज, तसेच संदिप दिपक भिल याच्याकडून चोरी केलेले १ ए.सी., ३ कुलर व १ एल.जी. कंपनीचा फ्रिज असा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीसांनी चोरट्यांकडून २ लाख ४५ हजार रुपये किमतीचे दिड टन क्षमतेचे ७ ए.सी.,३० हजार रुपये किमतीचे ४०० लीटर क्षमतेचे १ डी-फ्रिज,३० हजार रुपये किमतीचे ३ कुलर, ३० हजार रुपये किमतीचे एल.जी.कंपनीचे ३२० लीटर क्षमतेचे फ्रिज असा एकूण ३ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे तसेच उप-विभागीय पोलीस अधिकारी सुनिल गोसावी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक के.के. पाटील, पोउनि हेमंत खैरनार तसेच डी. बी. पथकाचे पोहेकॉ राजेंद्र रोकडे, रविंद्र आखडमल, योगेश दाभाडे, विनोद आखडमल, गोविंद कोळी, भटु साळुंके, प्रशांत पवार, आरीफ तडवी, सचिन वाघ, मनोज दाभाडे, मनोज महाजन,रविंद्र महाले, जगन्नाथ माळी, विजय पाटील,शरद पारधी, राम भिल व मिथुन पवार यांनी केली आहे.